**रे.दि. मु. नं. १३५/२०१५ मधील नि.क्र.६३ खालील आदेश**
**(तुकाराम दिनकर यादव वगैरे वि.गुणाबाई ज्ञानोबा यादव वगैरे)**
**CNR No.- MHST16-000766-2015**

प्रस्तुतचा अर्ज वादीने दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ प्रमाणे दावा दुरुस्त करणेसाठी केला आहे.

वादीचे अर्जातील कथन थोडक्यात असे आहे की,

२. वादीने सदरचा दावा हा प्रतिवादी यांचेविरुध्द सरस निरस मानाने वाटप होऊन मिळणेकरीता दाखल केला आहे. दाव्याचे कामकाज चालू असताना प्रतिवादी क्र.१ या दिनांक ०४.०७.२०१६ रोजी मयत झाल्या आहेत. प्रतिवादी क्र.१ यांचे वारस हे अगोदरच अभिलेखावर आहेत. प्रतिवादी क्र.१ यांना एक मुलगा व चार मुली असे वारस आहेत. सदरची दुरुस्ती दाव्याचे कामी करणे आवश्यक असल्याने दाव्यात खालीलप्रमाणे दुरुस्ती करण्यास परवानगी मिळावी, ही विनंती वादीने केली आहे.

> दाव्याचे सरनाम्यात **प्रतिवादी क्र.१ हिच्या नावास कंस करण्यात यावा व त्याच्या पुढे "मयत" असे लिहण्यास यावे व त्याच्या खाली "वारस प्रतिवादी क्र.२ ते ६" असे लिहण्यात यावे.**

३. सदर अर्जावर प्रतिवादी क्र.६३ यांनी म्हणणे दाखल करुन अर्जातील मजकुर अमान्य केला आहे. त्यांचे असे म्हणणे आहे की प्रतिवादी क्र.१ चे वारस दाव्यामध्ये सामील करणेकामी वादीतर्फे मुदतीत तजवीज न केल्याने सदर दावा मयत प्रतिवादी क्र.१ हिचे विरुद्ध अबेट झालेला आहे. त्यामुळे इतर प्रतिवादींना बचाव प्राप्त झालेला असून तो पुसुन काढण्याच्या उद्देशाने व केवळ प्रतिवादीस त्रास देण्याच्या उद्देशाने दावा प्रलंबीत ठेवलेला आहे. वादीचा अर्ज खर्चासह नामंजुर करण्यात यावा.

४. वादीचा अर्ज व दाव्यातील कथने तसेच अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, वादीने सदरचा दावा हा प्रतिवादी यांचेविरुध्द सरस निरस मानाने वाटप होऊन मिळणेकरीता दाखल केला आहे. सदर दुरुस्ती ही तांत्रीक स्वरुपाची आहे. सदर दुरुस्तीमुळे प्रतिवादींचे कोणतेही नुकसान होणार नाही. तसेच दाव्याचे स्वरुपातही बदल होणार नाही. याउलट

दाव्याचा गुणदोषावर निकाल होण्याकरीता सदरची दुरुस्ती मंजूर करणे योग्य होणार आहे. सबब दाव्याचे स्वरुप विचारात घेता व दाव्याचे अंतिम निराकरण होण्याकरीता अर्ज मंजूर करणे योग्य होईल. करिता, खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे.

**<u>आ दे श</u>**

१. अर्ज मंजुर करण्यात येत आहे.

२. वादीने अर्जात नमुद केलेली दुरुस्ती नियमानुसार विहीत वेळेत करावी व दुरुस्त प्रत १४ दिवसांचे आत दाखल करावी.

CHHAYA VIKRAM SHIRSAT

Digitally signed by CHHAYA VIKRAM SHIRSAT
Date: 2023.10.12 11:45:30 +0530

ठिकाण – वाई. (सी. व्ही. शिरसाट)

दिनांक – ११.१०.२०२३. सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर वाई.